
D.M Chavan: Parrashtra Dhoran An Apli Bhumika



ISBN 978-81-939083-4-1

# भारतीय राजकारण

भारतीय राजकारणावरील विविध शाखांच्या अध्यापकांनी
घेतलेल्या संशोधनपर लेखांचा संपदित ग्रंथ

संपादन
डॉ. अनिल विश्वास

टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

मूल्य दोनशे रुपये

❒ ISBN 978-81-939083-4-1

❒ **भारतीय राजकारण**
Bhartiya Rajkaran

❒ **संपादन**
डॉ. अनिल विश्वास

❒ **सर्व हक्क सुरक्षित**

❒ **प्रथमावृत्ती** १ ऑगस्ट, २०१९

❒ **प्रकाशन क्र.** २४

❒ **प्रती** ५००

❒ **आकार** डेमी

❒ **प्रकाशक**
टिआरा पब्लिकेशन्स
दशभूजा गणेश मंदिरागागे, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९
tiarapublication@rediffmail.com

❒ मूल्य २०० रुपये

(या ग्रंथात प्रकाशित विचार हे त्या त्या मान्यवरांचे असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-5 |
| 1 | भारतातील लोकशाही | प्रा. रेखा वाठ | 6-8 |
| 2 | जागतिक राजकारणाची बदलती पद्धत | डॉ. अभय रानडे | 9-12 |
| 3 | राजकीय पक्षांची भूमिका | प्रा. एन.आर. उवळे | 13-15 |
| 4 | सत्तासंघर्षात पक्षाची बदलती भूमिका | डॉ. संजय वानखडे | 16-20 |
| 5 | भारत–चीन संबंध – एक अभ्यास | प्रा. डी.एस. पाटील | 21-23 |
| 6 | राजकारणातील राजकीय पक्षाचे बदलते स्वरूप | डॉ. सावित्री सनागळे | 24-26 |
| 7 | सत्तातरांचे बदलते स्वरूप विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा.सरोज लखदिवे | 27-29 |
| 8 | भारतीय राजकारण आणि राजकीय पक्ष | प्रा. डॉ. सुशीला डाबरे | 30-32 |
| 9 | राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्त्व:<br>एक अध्ययन | प्रा. नीळकंठ नरूले | 33-35 |
| 10 | यवतमाळातील सामाजिक समस्या व उपाय | प्रा. प्रशांत जवादे | 36-38 |
| 11 | महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडी | डॉ. संदेश सामटकर | 39-41 |
| 12 | बदलत्या परराष्ट्र धोरणाचा जागतिक राजकारणावर झालेला<br>परिणाम | डॉ. कैलाश नेमाडे | 42-44 |
| 13 | राजकारणात नैतिक मापदंडाची पायमल्ली | डॉ. एस. एम. टाकळे | 45-49 |
| 14 | आपल्या देशापुढील परराष्ट्र धोरणाची आव्हाने | डॉ. गिरीधर साळवे | 50-52 |
| 15 | परराष्ट्र धोरण आणि आपली भूमिका | डॉ. डी.एम. चव्हाण | 53-55 |
| 16 | विविध राजकीय पक्षांची बदलती भूमिका – एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. पांडुरंग इंगळे | 56-57 |
| 17 | राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांचे बदलते स्वरूप | प्रा. दमयंती वाळके | 58-59 |
| 18 | इतिहासात महिलांचे स्थान : ऐतिहासिक अवलोकन | प्रा. शीतल राऊत | 60-63 |
| 19 | राजकीय पक्षांची बदलती भूमिका व परिणाम | प्रा. माणिकराव पवार | 64-65 |
| 20 | भारतीय राजकारण आणि भारतीय राजकीय पक्षांची<br>बदलती पध्दत | प्रा.स्नेहल खांडेकर | 66-68 |
| 21 | राज्याच्या लोकशाहीत पक्षाची बदलती कार्यपध्दती | प्रा. डॉ. संजय बनसोडे | 69-70 |
| 22 | भारतीय संविधान | डॉ. वेद पतकी | 71-74 |
| 23 | भूतपूर्व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग | डॉ. वीरा मांडवकर | 75-77 |
| 24 | राजकीय पक्षांचे सत्तास्वार्थ | प्रा.डॉ. वैदेही सामरा | 78-83 |

# परराष्ट्र धोरण आणि आपली भूमिका

डॉ. डी.एम. चव्हाण
ठंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रास्ताविक —

भारताचे परराष्ट्र धोरण भारतीय स्वातंत्र्य चळवळी बरोबर विकसीत होत गेले. भारतीय परराष्ट्र धोरणाची निर्मिती मध्ये अरविंद यांचा अध्यात्मवाद, टागोर यांचा आंतरराष्ट्रीयवाद, महात्मा गांधी यांचा अहिंसावाद, गोखले याचा उदारमतवाद, नेहरू यांचा लोकशाही समाजवाद या पाच विचारसरणीतून झाली व यातूनच पंचशिल तत्त्वे विकसीत झाले. प्रत्येक राष्ट्राची भौगोलिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे, युद्ध आणि आक्रमणाचा विरोध करणे, इतर राष्ट्रांचा अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, समानता आणि परस्पर फायदा, शांततापूर्ण सहजीवन ही पंचशिल तत्त्वे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मार्गदर्शक आहे. भारतीय संविधानाच्या कलम ५१ मधील मार्गदर्शक तत्त्वामध्ये काही आंतरराष्ट्रीय तत्त्वाचा समावेश करण्यात आला. हे तत्त्वे भारताचे परराष्ट्र धोरण आखण्यात मदत करतात त्यामध्ये १) राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय शांती व सुरशिततेच्या वाढीसाठी प्रयत्न करणे, २) राष्ट्रामध्ये न्यायसंगत आणि सन्मानपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे, ३) परस्पराचा व्यवहारामध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व कराप्रति आदर निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, ४) आंतरराष्ट्रीय संघर्ष शांतता आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रोत्साहन देणे.

परराष्ट्र धोरणाची निर्मिती ही सर्वोच्च शासनकर्त्यामार्फत होत असते पण आधुनिक काळातील लोकशाही व्यवस्थेत परराष्ट्र धोरणाची निर्मिती राज्याच्या शासनकर्त्यामार्फत होत असते. याचे अध्ययन परराष्ट्र धोरण निर्मितीत पंतप्रधानांची भूमिका या विषयाच्या अनुषंगाने केल्या गेले.

## पंडित जवाहरलल नेहरू —

भारताचे परराष्ट्र धोरण निर्माण करण्यासाठी नेहरूंनी आदर्श तत्त्वाचा आधार दिला. त्यांनी नैतिक मुल्यांची जोड परराष्ट्र धोरणाला दिली. भारतीय संस्कृती, तत्त्वे, मुल्ये आणि अरविंद घोष ने गांधी यांच्या विचारांचा एकत्रीत सार करून भारताचे परराष्ट्र धोरण आखले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू १९४७ ते १९६४ च्या कार्यकाळात जवळपास १६ वर्ष भारताचे परराष्ट्र मंत्री सुद्धा पंडित नेहरू हे होते. त्यामुळे त्यांचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडला आहे. भारताचे परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार सुद्धा त्यांनाच म्हटले जाते.
पंडित नेहरूच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्ये —

१) परराष्ट्र धोरण आदर्शवादी असून त्यात नैतिक मुल्यांना अधिक स्थान होते.
२) पंडित नेहरूच्या परराष्ट्र धोरणात हितसंबंधाना दुय्यम स्थान होते.
३) पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामुळे राष्ट्रीय सुरक्षेप्रमाणेच मानवी सुरक्षेला अधिक महत्त्व होते.
४) पंडित नेहरूंनी अलिप्तवादी धोरणाचा स्वीकार केला.
५) वंश भेदाला विरोध, साम्राज्यवादाल विरोध करून निशस्त्रीकरण तसेच पंचशिल तत्त्वे यांना महत्त्व दिले.

पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणामध्ये हितसंबंधापेक्षा विचारसरणीला महत्त्व दिले. त्यांनी परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून सर्वसमावेशक सुरक्षा योजना व भारताचा विकास या दोन गोष्टी साधण्याचा प्रयत्न केला दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन देशाच्या नेतृत्वाखाली जगाची दोन गटात विभागणी झाली. परंतु भारताने कोणत्याही गटांचे नेतृत्व न स्वीकारता अलिप्तवादी चळवळ सुरू केली व त्यामध्ये पंडित नेहरूचे मोठे योगदान होते.

पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणामध्ये सामुहिक विकासावर अधिक भर दिला. संघर्ष, युद्धाना विरोध करून त्यानी शांततामय सहजीवनावर अधिक भर दिला.

## लाल बहादूर शास्त्री —

पंडित नेहरूच्या निधनानंतर १९६४ साली भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री झाले. त्यांनी नेहरूच्या आदर्शवादी दृष्टिकोनापेक्षा यथार्थवादी दृष्टिकोनाला महत्त्व दिले. त्यांच्या कार्यकाळात भारत—पाक युद्ध झाले. या युद्धात भारताने विजय मिळवून भारत—चीन युद्धाच्या वेळी आंतरराष्ट्रीय समुदायात गेलेली पत पुन्हा मिळवून दिली. शास्त्रीनी महाशक्तीशाली राष्ट्रापेक्षा दक्षिण—पूर्वी आशियाई राष्ट्राला जास्त प्राधान्य दिले.